CMYK

एप्रिलमध्ये बेलोरा विमानतळावरून अमरावतीकरांना टेकऑफची सुविधा : डॉ. अनिल बोंडे यांची माहिती >>पान 2

रोबोटिक सर्जिकल सिस्टीमला राज्य सरकारकडून मान्यता >>पान 3

केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते 'ऑस्ट्रेलिया-भारत क्रीडा उत्कृष्टता मंच'चे उद्घाटन, क्रीडा क्षेत्रात नवे पर्व उद्यास >>पान 4

**सुविचार**

अनुभवी माणसाचे सल्ले नेहमी मोलाचे असतात.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



प्रेम, ब्रेकअप आणि पुन्हा पॅचअप! अभिनेत्रीच्या लव्ह स्टोरीतले ट्विस्ट वाचून लावाल डोक्याल हात

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 204 ■ गुरूवार, दि. 06 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा एकनाथ शिंदेंना आणखी एक धक्का!

## एमसीआरडीसीच्या अधिकाऱ्याला केले पदमुक्त

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात सुरू असलेल्या 'कोल्ड वॉर'च्या चर्चेत आणखी एका मुद्यांची भर पडली आहे. कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांना पुन्हा अजुन एक धक्का दिल्याचे बोललं जात आहे. एकनाथ शिंदे यांनी सीएम असताना निवृत्त झालेले कैलास जाधव यांना एमसीआरडीसीच्या सह व्यवस्थापकीय संचालक पदावर नियुक्ती केली होती. मात्र तत्कालीन मुख्यमंत्री शिंदेंनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला मुख्यमंत्री फडणवीसांनी आता पदमुक्त केलं आहे.



त्यामुळे कैलास जाधव यांना आता तात्काळ सेवामुक्त करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागानं काढले असल्याची ही माहिती पुढे आली आहे.

दरम्यान, निवृत्त झालेल्या जाधव यांच्या जागी वैदयही रानडे यांच्याकडे कार्यभार देण्याचे नव्याने आदेश काढण्यात आले आहे. जाधव यांच्या निवृत्तीनंतर एक वर्ष करार पद्धतीने सह संचालक एमएसआरडीसी पदावर नियुक्ती एकनाथ शिंदे हे सीएम असताना केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र तात्काळ करार सेवा समाप्ती आदेश काढत कैलास जाधव यांच्या एवजी वैदयही रानडे यांची नियुक्त केली आहे. अशातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या अधिकाराचा वापर करुन अनेक निर्णय घेत आहेत, ज्याचा फटका एकनाथ शिंदेना बसत असल्याची चर्चाही राजकीय वर्तुळात आहे. अशातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांना अजून एक धक्का दिला असल्याचे पुढे आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना धक्कातंत्र अवलंबले आहे का? >>पान २

# अबु आझमींचे अधिवेशन संपेपर्यंत निलंबन

## औरंगजेबाच उदात्तीकरण भोवलं; छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणांनी दणाणले सभागृह

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी :सपा आमदार अबू आझमी यांना औरंगजेबाच उदात्तीकरण करणं भोवलं आहे. अधिवेशन संपेपर्यंत सपा आमदार अबू आझमी यां चं निलंबन करण्यात आलं आहे. त्यांच सदस्यत्व रद्द करा अशी मागणी भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. सुधीर मुनगंटीवार विधानसभेत आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. औरंगजेबाबद्दल अबू आझमी यांनी एक वक्तव्य केलं होतं. त्यांनी औरंगजेबाला उत्तम प्रशासक म्हटलं होतं. त्यावरून सुधीर मुनगंटीवार यांनी आक्षेप घेतं आझमी यांचे सदस्यत्व रद्द करण्याची मागणी केली आहे. औरंगजेबाबाबत केलेलं वक्तव्य आझमींना भोवलं आहे.





समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमींना निलंबित करण्यात आले आहे. किती काळासाठी त्यांचं निलंबन करण्यात यावं यासाठी एक समिती नेमण्यात आली आहे. औरंगजेबाच्या संदर्भात केलेल्या वादग्रस्त विधानामुळे अबू आझमींना निलंबित करण्यात आलं आहे. मंत्री चंद्रकांत पाटलांनी विधानसभेमध्ये अबू आझमींच्या निलंबनाचा प्रस्ताव मांडला. सुधीर मुनगंटीवार यांनी आपली आक्रमकपणे भूमिका मांडली. याचदरम्यान अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी आवाजी मतदान घेतलं. या आवाजी मतदानामध्ये एकमताने ठराव मंजूर झाल्याचं जाहीर करत अबू आझमींचं निलंबनावर शिक्कामोर्तब केलं आहे. अबू आझमी यांना आता अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सहभागी होता येणार नाही. अधिवेशन कालावधी संपेपर्यंत अबू आझमींवर विधानसभेच्या इमारतीच्या आवारात येण्यासही बंदी घालण्यात आली आहे.

सभागृहात बोलताना आमदार चंद्रकांत पाटील म्हणाले, अध्यक्ष महोदय मी असा प्रस्ताव मांडतो की, अबू आझमी यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना औरंगजेब उत्तम प्रशासक होता, असं त्याची भलामण करणारे आणि छत्रपती संभाजी महाराजांबाबत वादग्रस्त वक्तव्य केलं. ही त्यांची वक्तव्ये आक्षेपार्ह आहेत. त्यांची वक्तव्यं निषेधार्ह आहेत. यामुळे सभागृहाचा अपमान झाला आहे. >>पान २



## औरंगजेबाचे गोडवे गाणाऱ्या अबू आझमींचं आयुष्य संकटात, म्हणाले, 'माझ्या जीवाचं बरंवाईट झालं तर....'

**मुंबई/प्रतिनिधी** :'औरंगजेब उत्तम प्रशासक असल्याच्या वादग्रस्त प्रतिक्रियेनंतर सपा आमदार अबू आजमी यांचे निलंबन करण्यात आले. विधानसभेत आज अबू आझमींच्या निलंबनावरून सभागृह दणाणले. दरम्यान, या घटनेनंतर मला अनेक धमक्यांचे फोन येत आहेत. माझ्या जीवाला काही झाल्यास सरकारला जबाबदार धरावे असं अबू आझमी म्हणाले आहेत. मी आजवर महापुरुषांचा अपमान केला नाही. देशाचा एक राजा ज्याच्या विषयी इतिहासात लिहून ठेवले तेच मी बोललो, असेही ते म्हणाले. सपाचे आमदार अबू आझमी यांना औरंगजेबाची स्तुती करणारे वक्तव्य चांगलेच भोवले असून विधानसभेत झालेल्या गोंधळानंतर एकमताने अबू आझमींना अधिवेशन संपेपर्यंत निलंबित करण्यात आले. निलंबनावर अबू आझमींनी निषेध व्यक्त केला असून या विरोधात कायदेशीर दाद मागणार असल्याचेही ते म्हणालेत. दरम्यान, अबू आझमी यांनी या घटनेनंतर आपल्याला धमकीचे फोन कॉल येत असल्याची माहिती दिली. >>पान २



## कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंना मोठा दिलासा, २ वर्षाच्या शिक्षेला स्थगिती

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** :राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यां विरोधात दाखल केलेली याचिका सत्र न्यायालयाने फेटाळली आहे. उच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल केली आहे. त्याबाबत सुनावणी होण्यासाठी १५ दिवस कामकाज तहकूब करुन वेळ देण्यासाठी नाशिकच्या सत्र न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र दाखल केलेल्या याचिकेवर रीट याचिका क्रमांक आणि अर्जदाराची स्वाक्षरी नसल्यानं अंजली राठोड यांची हस्तक्षेप याचिका फेटाळली आहे. थोड्याच वेळात माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेच्या स्थगितीवर निकाल येण्याची शक्यता आहे.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. खालच्या कोर्टाने दिलेल्या २ वर्षाच्या शिक्षेला जिल्हा सत्र न्यायालयाने स्थगिती दिली आहे. शिक्षेला स्थगिती दिल्याने कोकाटे यांची आमदारकी शाबूत राहणार आहे. कमी उत्पन्न दाखवून सरकारच्या १० टक्के कोट्यातून घर घेतल्याने कनिष्ठ न्यायालयाने माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या बंधूना यांना २ वर्षांची शिक्षा सुनावली होती.

नाशिक शहरातील उच्चभ्रू परिसरात माणिकराव कोकाटे यांनी ३० वर्षांपूर्वी अल्प उत्पन्न गटातून सदनिका मिळवली होती. स्वत:सह भाऊ विजय कोकाटे, पोपट सोनवणे आणि प्रशांत गोवर्धने या चार जणांनी कॅनडा कॉर्नर भागात निर्माण >>पान २



## गद्दारांना 'छावा' दाखवलाच पाहिजे; उद्धव ठाकरेंचा शिंदेंवर हल्लाबोल, निलम गोऱ्हे अन् अबू आझमींवरही टीका

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज अधिवेशन सुरू असताना विधिमंडळ सभागृहात हजेरी लावली. शिवसेना व महाविकास आघाडीतील नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून गाजलेल्या मुद्द्यावरुन आज सभागृहात गदारोळ झाल्याचं दिसून आलं. त्यानंतर, समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांच्या निलंबनाची मागणी करत सत्ताधारी व विरोधकांनी या प्रस्तावास एकमताने मंजुरी दिली. >>पान २

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरांवर आता पती-पत्नीचं नाव

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक महिला दिन ८ मार्च रोजी आहे. या दिवसाच्या पार्श्वभूमीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत एक महत्त्वाचा निर्णय झाला आहे. या निर्णयानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरांवर आता पती आणि पत्नी अशी दोघांच्याही नावाची नोंद केली जाणार आहे. संपूर्ण मुंबई म हानगर प्रदेशात हा नियम झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी लागू असेल.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या नव्या नियम ानुसार पुनर्विकासात मिळणारे घर पती-पत्नी यांच्या संयुक्त नावे करणे बंधनकारक आहे. संपत्तीत पती आणि पत्नी या दोघांचाही वाटा असल्याचे समजतात. याच पद्धतीने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरांवर आता पती आणि पत्नी या दोघांचाही हक्क असेल.

घरावर पती आणि पत्नीचे हक्क असल्यास कायदेशीर अडचणी येत नाही. मात्र, काही प्रकरणात अशी नावांची नोंद नसल्यास पतीच्या निधनानंतर महिलेस कायदेशीर अडचणींना तोंड द्यावे लागते. >>पान २

# वाहतूक व्यवस्थेचे तीन तेरा, उपराजधानीत रस्ते अपघातांत महिलेसह तीन ठार

**नागपूर/प्रतिनिधी :** शहरात वेगवेगळ्या तीन ठिकाणी झालेल्या अपघातात एका महिलेसह तीन जण ठार झाले तर दोन जण गंभीर जखमी झाले. हे अपघात कळमना,पारडी आणि जरीपटका परिसरात झाले. मंगला महिपत उमाटे (५१, रा.बिडगाव चौक, वाठोडा), विकास चंद्रशेखर बोरकर (३२, समतानगर, जरीपटका) आणि आयूष प्रितम अवचट (१७, रा. सुभाष मैदान, पारडी) अशी अपघातात ठार झालेल्यांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या घटनेत, मोटारसायकलने जात असलेल्या दोन तरुणांना भरधाव टिप्परच्या चालकाने जबर धडक दिली आणि पळून गेला. या अपघातात एका तरुणाचा उपचार मिळण्यापूर्वीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी आहे. आयूष अवचट (१७) हा ठार झाला तर जखमी अमन जगदीश मानकर (२१) रा. पारडी याच्यावर मेडिकल रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सोमवारी रात्री एक वाजता आयूष आणि अमन मोटारसायकलने जात होते. भरतनगर रोडने कळमना मार्केटकडे जात असताना गोकुळ डेअरीजवळ मागून आलेल्या ट्रकने मोटारसायकलला जबर धडक दिली आणि पळून गेला. ही धडक इतकी जोरदार होती की दोघेही दुचाकीवरून उसळत रस्त्यावर पडले. दोघांनाही गंभीर मार लागला. आसपासचे नागरिक मदतीसाठी धावले. दोन्ही जखमींना रुग्णालयात रवाना करण्यात आले. मात्र आयूषचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर अमनवर उपचार सुरु आहेत. पोलिसांनी आयूषचे काका प्रशांत यांच्या तक्रारीवरून आरोपी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरू केला आहे.



दुसऱ्या घटनेत, महिपत उमाटे हे पत्नी मंगला यांच्यासह सोमवारी दुपारी बारा वाजता दुचाकीने जात होते. नागेश्वरनगरातून जात असताना त्यांना स्कूल बसने धडक दिली. या धडकेत दोघेही पती-पत्नी गंभीर जखमी झाले. मंगला यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान मंगला यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी स्कूलबसच्या चालकाविरुद्ध पारडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

तिसऱ्या घटनेत, विकास चंद्रशेखर बोरकर हा रविवारी अकरा वाजता पायी घराकडे जात होता. मार्टीननगरातून जात असताना एका भरधाव ट्रकने विकासला धडक दिली. या धडकेत विकास गंभीर जखमी झाला. त्यांना मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादम्यान विकासचा मृत्यू झाला.

नागपूर : अजनीच्या काशीनगर परिसरात एका कारच्या चालकाने हैदोस घालत एका महिलेला धडक देऊन गंभीर जखमी केले. त्यानंतर त्याने परिसरातील तीन वाहनांना धडक देऊन नुकसान केले. या घटनेमुळे काही वेळासाठी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी आरोपी कार चालक आदर्श मिश्रा (३३) रा. काशीनगरविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. जखमी महिला माला गोवर्धन पोटपोसे (६५) यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी रात्री म ाला यांच्या घरी पाहुणे आले होते. त्यांच्यासाठी मालाने गेट उघडले. त्याच वेळी आरोपी आदर्श कारने भरधाव घरी जात होता. या दरम्यान त्याचे वाहनावरून नियंत्रण सुटले आणि त्याने गेट बंद करीत असलेल्या माला यांना जबर धडक दिली. त्यानंतर घराजवळच उभ्या तन्मय पांडव यांची मोटारसायकल, मालाचे जावई शैलेष मेंढे यांची कार आणि राज कांबळे यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. यात तिन्ही वाहनांचे नुकसान झाले. मोठा आवाज आसपासचे नागरिक घरातून बाहेर आले. आदर्श घटनास्थळावरून पळण्याच्या तयारीत असतानाच लोकांनी त्याला पकडले. काही लोकांनी त्याला मारहाणही केली. घटनेची माहिती मिळताच अजनी पोलिस घटनास्थळी पोहोचले. आदर्शविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला ताब्यात घेतले.

CMYK

## विजेतेपदापासून एक पाऊल दूर

पाकिस्तान आणि दुबईत चालू असलेली एकदिवसीय चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा अंतिम टप्प्यात आली असून अपेक्षेप्रमाणे भारताने या स्पर्धेत चमकदार कामगिरी करत अंतिम फेरी गाठली. भारताने काल झालेल्या पहिल्या उपांत्य लढतीत पाच वेळेचा विश्र्व विजेता आणि दोन वेळेचा चॅम्पियन्स ट्रॉफीचा विजेता असलेल्या ऑस्ट्रेलियाला चार गडी राखत सहज नमवले. वास्तविक हा सामना सुरू होण्यापूर्वीच भारत या सामन्याच्या संभाव्य विजेता म्हणून गणला जात होता मात्र क्रिकेट रसिकांच्या मनात कोठेतरी धाकधूक होती कारण ऑस्ट्रेलिया हा संघ भारताला कायम जड गेला आहे विशेषतः आयसीसी स्पर्धेत ऑस्ट्रेलियाने कायम भारतावर वर्चस्व राखले आहे. बाद फेरीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताला अनेकदा नमवले आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये एकदिवसीय विश्र्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियानेच भारताचा पराभव करून विश्र्वविजेता होण्याचे १४४ कोटी भारतीयांचे स्वप्न धुळीस मिळवले होते. त्याच वर्षी झालेल्या विश्र्व कसोटी चॅम्पियन्सशिपच्या अंतिम फेरीतही ऑस्ट्रेलियानेच भारताला हरवले होते. इतकेच काय २००३ च्या विश्र्वचषक स्पर्धेतही ऑस्ट्रेलियानेच भारताने हरवले होते त्यामुळे यावेळीही ते त्याची पुनरावृत्ती करतील की काय ? अशी भीती क्रिकेट रसिकांना होती मात्र भारतीय खेळाडूंनी अप्रतिम खेळ करून ही भिती खोटी ठरवली. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या पहिल्या लढतीत ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करत २६४ धावा काढल्या. भारताच्या सर्वच गोलंदाजांनी अप्रतिम गोलंदाजी करून ऑस्ट्रेलियाचे सर्व फलंदाजांना बाद केले. भारतीय गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी करत ऑस्ट्रेलियाला पूर्ण ५० षटकेही खेळू दिले नाही. गोलंदाजांनी केलेल्या अप्रतिम कामगिरीने भारताचे पन्नास टक्के काम फत्ते झाले होते मात्र फलंदाजी करताना रोहित शर्मा आणि शुभमन गिल ही कर्णधार आणि उपकर्णधारची जोडी स्वस्तात बाद झाल्याने क्रिकेट रसिकांची धाकधूक वाढली पण चेस मास्टर असलेला जगातील सर्वोत्तम फलंदाज असलेल्या विराट कोहलीने मै हू ना.... म्हणत नेहमीप्रमाणे दिमाखदार खेळ करत भारताला विजय मिळवून दिला. संघ अडचणीत असताना विराट कोहलीने ८४ धावांची आकर्षक खेळी करून कांगारू गोलंदाजांची हवा काढून टाकली त्याला श्रेयस अय्यर, अक्षर पटेल, के एल राहुल आणि हार्दिक पांड्य ने अप्रतिम साथ दिली त्यामुळे भारतीय संघ अंतिम फेरीत पोहचू शकला. भारताने या सामन्यात अप्रतिम खेळ केला. केवळ याच सामन्यात नव्हे तर संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाने अप्रतिम कामगिरी केली. भारताने या स्पर्धेत खेळलेल्या सर्वच्या सर्व सामन्यात विजय मिळवत अंतिम फेरीचे तिकीट बुक केले. ६ तारखेला दक्षिण आफ्रिका व न्युझीलंड यांच्यात दुसरा उपांत्य सामना लाहोरच्या गडाफी स्टेडियमवर होईल. हा लेख तुमच्या हातात पडेपर्यंत या सामन्याचा निकाल लागलेला असेल या या सामन्यातील विजयी संघ ९ तारखेला विजेतेपदासाठी अंतिम सामन्यात भारताशी लढेल. भारताने या स्पर्धेत चमकदार कामगिरी करत दिमाखात अंतिम फेरी गाठली आहे. या स्पर्धेतील एकमेव अजिंक्य संघ भारत आहे. या स्पर्धेत एकाही संघाला भारताला नमवण्यात यश आले नाही. विशेष म्हणजे भारताने जिंकलेले सर्वचे सर्व सामने एकतर्फी जिंकले आहेत. प्रतिस्पर्धी संघाला भारताने जराही संधी दिली नाही. गोलंदाजी, फलंदाजी, आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारताने एकहाती वर्चस्व गाजवले आहे. भारताचे सर्व फलंदाज जबरदस्त फॉर्मात आहे. रोहित, विराट, गील, श्रेयस, राहुल सर्वांनीच धावा काढल्या आहेत. हार्दिक पांड्याला मोठी धावसंख्या उभारता आली नसली तरी तो मोक्याच्या वेळी मॅच विनिंग खेळी करू शकतो. उपांत्य फेरीत त्याने ते दाखवून दिले आहे. भारताचे गोलंदाज तर स्वप्नवत कामगिरी करत आहे. भारताचे सर्वच गोलंदाज अप्रतिम कामगिरी करत प्रतिस्पर्धी फलंदाजांना जेरीस आणत आहेत. शमी, पांड्या, जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती या भारताच्या गोलंदाजांनी या स्पर्धेत जी कामगिरी केली आहे तशी कामगिरी याआधी भारताच्या कोणत्याही गोलंदाजांनी केलेली नाही. एकाच वेळी भारताच्या सर्व गोलंदाजांमध्ये विकेट घेण्याची स्पर्धा लागली आहे विशेष म्हणजे यात सर्वच गोलंदाज यशस्वी होत आहे. एकाच स्पर्धेत सर्वचे सर्व गोलंदाज भेदक गोलंदाजी करत असल्याचे चित्र प्रथमच पाहायला मिळत आहे. असे म्हणतात की फलंदाज सामना जिंकून देतात तर गोलंदाज स्पर्धा. भारताने या स्पर्धेवर जे एकहाती वर्चस्व गाजवले आहे ते गोलंदाजांमुळेच. गोलंदाजांचा हाच फॉर्म अंतिम फेरीत कायम राहिला तर भारत या स्पर्धेचा विजेता ठरेल यात शंका नाही. आज होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य फेरीत न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका एकमेकांशी झुंझेल. अर्थात न्यूझीलंडचा सध्याचा फॉर्म, अनुभव आणि दक्षिण आफ्रिकेची ऐनवेळी कच खाण्याची वृत्ती पाहता ते दक्षिण अफ्रिकेला मात देऊन अंतिम फेरीत पोहचू शकतात. तसे झाले तर ९ तारखेला भारत आणि न्यूझीलंड यांच्यात अंतिम सामना रंगू शकतो. अर्थात न्युझीलंड असो की दक्षिण आफ्रिका समोर कोणीही असो भारतीय संघाने जर आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारताला कोणीही विजयापासून रोखू शकत नाही भारत. उपांत्य फेरी प्रमाणे भारतीय खेळाडूंनी अंतिम फेरीत खेळ केला तर भारतला चॅम्पियन्स होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही एकूणच चॅम्पियन ट्रॉफीच्या विजेतेपदापासून भारत अवघा एक पाऊल दूर आहे. जर भारतीय खेळाडूंनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला आणि नशिबाने साथ दिली तर हे एक पाऊल पार करून भारत १२ वर्षाने चॅम्पियन्स ट्रॉफीवर नाव कोरु शकतो आणि १४४ कोटी भारतीयांचे स्वप्न साकार करू शकतो. भारतीय संघाला अंतिम फेरीसाठी शुभेच्छा!

# एप्रिलमध्ये बेलोरा विमानतळावरून अमरावतीकरांना टेकऑफची सुविधा : डॉ. अनिल बोंडे यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** बहुप्रतिक्षित अमरावतीच्या बेलोरा विमानतळावरून अमरावतीकरांच्या टेकऑफची प्रतीक्षा संपणार आहे. विमानतळ इमारत निर्माणसह विविध प्रकारचे काम पूर्ण झाले असून, नागरी उड्डाण मंत्रालयाच्या उडाणा संदर्भातील परवानगीची प्रक्रियाही अंतिम टप्प्यात आली आहे. एप्रिलमध्ये अमरावती ते मुंबई अशी विमानसेवा सुरू होणार असल्याची माहिती राज्यसभा सदस्य




डॉ. अनिल बोंडे यांनी दिली. बोंडे यांनी विमानतळ प्राधिकरणाचे अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत प्रगतीत असलेल्या विमानतळाच्या कामकाजाची पाहणी देखील केली.

अमरावतीच्या बेलोरा विमानतळाचे काम पूर्ण झालेले आहे. धावपट्टी, इमारत निर्माण यासह सुसज्ज विमानतळासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा या ठिकाणी विकसित करण्यात आलेल्या आहेत. त्या संपूर्ण कामकाजाचा आढावा डॉ.अनिल बोंडे यांनी घेतला. नागरी उड्डाण संचालनालयाकडे उड्डाणा संदर्भातील आवश्यक असलेल्या परवानगीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली आहे. मार्च महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात ही प्रक्रिया पूर्ण होऊन एप्रिल महिन्यात बेलोरा विमानतळावरून प्रत्यक्षात उड्डाणाला सुरुवात होणार आहे. प्रथम अमरावती ते मुंबई ७८ आसनी क्षमतेचे विमान बेलोरा विमानतळावरून टेकऑफ करणार आहे. या फ्लाईटला एटीआर असे म्हणतात. त्यामुळे लवकरच अमरावतीकरांना अमरावती वरून विमान प्रवासाची प्रतीक्षा पूर्ण होणार आहे. त्यानंतर रात्र कालीन प्रवासाची सुविधा देखील विमानतळ प्राधिकरणाकडून विकसित केली जाणार असल्याची माहिती सुद्धा डॉ. अनिल बोंडे यांनी दिली.

## वाल्मिक कराडचा महागडा शौक ठरला अडचणीचा, पोलिसांच्या हाती लागला पुरावा

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरणाने महाराष्ट्र चांगलाच संतापला आहे. या हत्या प्रकरणाचे फोटो समोर आल्यानंतर संपूर्ण म हाराष्ट्रातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाचा मास्टरम ईंड म्हणून वाल्मिक कराड याचे नाव समोर आले आहे. सीआयडीने कोर्टात दाखल केलेल्या आरोपपत्रात संतोष देशमुख हत्या प्रकरण उलगडून सांगताना पुरावेदेखील नमूद केले आहेत. वाल्मिक कराडचा महागडा शौक त्याला भारी पडला आहे. वाल्मिक कराडचा हा महागडा शौक त्याला भारी पडला असून पोलिसांना तपासात फायदेशीर ठरला आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड याचा दाखल आरोपपत्रात आरोपी क्रमांक एक म्हणून उल्लेख करण्यात आला आहे. एकाप्रकारे तोच या हत्येत मास्टरमाईंड



असल्याचे आरोपपत्रात म्हणण्यात आले आहे. सध्या वाल्मिकचे तीन आयफोन पोलिसांनी जप्त केले आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणांतील आरोपी विष्णु चाटे याचा मोबाइल पोलिसांना सापडला नाही. पण, वाल्मिक कराडचे तीन महागडे आयफोन पोलिसांनी हस्तगत केले. या तीन आयफोनमुळे पोलिसांना तपासात मोठी मदत झाली.

वाल्मिक कराड गोल्डन रंगाचा आयफोन १६ प्रो वापरत होता. तसेच त्याच्याकडे एक गोल्डन रंगाचा आयफोन प्रो १३ देखील होता. तिसरा आयफोन १३ प्रो फिक्कट निळ्या रंगाचा होता. वाल्मिकचा गोल्डन रंगाचा आयफोन १६ प्रो या फोनची किंमत साधारण तीन लाखापर्यत आहे. इतर फोन दीड ते दोन लाखांच्या रेंजमधील आहे.

कराडच्या या महागड्या आयफोनच्या मदतीने खंडणी व हत्येच्या तपासातील काही मुद्दे अधोरेखित करण्यात तपास यंत्रणांना यश आले. सरपंच देशमुख हत्या, अवादा कंपनीकडे मागितलेली दोन कोटींची खंडणी, अ‍ॅट्रॉसिटी या तीन गुन्ह्यांचा तपास करून सीआयडीने दीड हजार पानांचे दोषारोपपत्र नुकतेच केले आहे. चाटे, कराड व घुले यांनी परस्परांना फोन केलेले होते. त्यामुळे तिघांपैकी दोघांच्या मोबाईलमध्ये कॉल्सचा डेटा असल्याने त्यातूनच काही माहिती मिळविण्यात यंत्रणांना यश आले. या सर्वांचेच आवाजांचे नमुने घेऊन त्याची मोबाईलमधील आवाजांशी पडताळणी झाली आणि आरोपपत्रामध्ये कराड पहिल्या, तर चाटे दुसऱ्या क्रमांकाचा आरोपी ठरला.

## प्रेम, ब्रेकअप आणि पुन्हा पॅचअप! अभिनेत्रीच्या लव्ह स्टोरीतले ट्विस्ट वाचून लावाल डोक्याल हात

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडमध्ये अनेक लव्ह स्टोरी चर्चेत असतात. अनेकांच्या लव्ह स्टोरी तर अगदी एखाद्या सिनेमासारख्याच असतात. सेलिब्रिटींच्या लाइफमध्ये काय चाललंय आणि ते कोणाला डेट करत आहे, रिलेशनशिपमध्ये आहे या गोष्टी जाणून घेण्यासाठी चाहते नेहमीच उत्सुक असतात. अशातच एका अभिनेत्रीची लव्ह स्टोरी जाणून घेऊया. जी खूप चर्चेत असते आणि सोशल मीडियावर याचीच चर्चा रंगलेली असते.

बी-टाऊनची ग्लॅम गर्ल जान्हवी कपूर नेहमीच तिच्या हटके लूक आणि हॉटनेस, ग्लॅमरमुळे चर्चेत असते. प्रोफेशनल लाइफसोबतच ती पर्सनल लाइफमुळेही नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. जान्हवी तिच्या रिलेशनशिपमुळे नेहमीच लाइमलाइटमध्ये असते. तिची लव्ह स्टोरी कशी सुरू झाली? याविषयी जाणून घेऊया.

जान्हवी कपूर सध्या शिखर पहाडियाला डेट करत आहे. त्यांचं नातं सुरुवातीला त्यांनी लपवलं मात्र आता त्यांनी ते जगजाहीर आहे. जान्हवी नेहमीच शिखर पहाडियासोबत स्पॉट होते. बॉलिवूडमधील हे सर्वात चर्चेतील कपल आहे. याची लव्ह स्टोरीही खूप हटके आहे. एका मुलाखतीमध्ये जान्हवी कपूरने सांगितलं होतं की तिची शिखर पहाडियासोबत कशी ओळख झाली? जान्हवी आणि शिखर पहाडियाची ओळख एका कॉमन फ्रेंडमुळे झाली होती. जान्हवी तेव्हा नुकतंच इंडस्ट्रीत पाऊल ठेवलं होतं. तेव्हा श्रीदेवीने तिला रिलेशनशिप ठेवण्यापासून मनाई केली होती. त्यानंतर जान्हवीने शिखरसोबत ब्रेकअप केलं. श्रीदेवीचं म्हणणं होतं की तिने तिच्या करिअरवर फोकस करावं.

शिखर पहाडियासोबत ब्रेकअपनंतर जान्हवीचं नाव ईशान खट्टरसोबत जोडलं गेलं. दोघांनी सोबत डेब्यू केला होता. त्यानंतर जान्हवीला समजलं की शिखरच तिचं खरं प्रेम आहे. ती पुन्हा शिखरकडे गेली. पुन्हा दोघांचं पॅचअप झालं. शिखर पहाडियाला जान्हवीच्या घरचे खूप पसंत करतात. त्याचं बोनी कपूर आणि खुशीसोबत खूप चांगलं नातं आहे. तो सतत जान्हवी आणि तिच्या फॅमिलीसोबत स्पॉट होत असतो.

पान १ वरून...

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा

असा सवाल राजकीय वर्तुळातून विचारले जात आहे. कारण, नुकतेच शिंदे सरकारच्या काळातील आरोग्य विभागाच्या ३ हजार २०० कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती देण्यात निर्णय देवेंद्र फडणवीसांनी घेतलाय. आरोग्य विभागात कामाचा कोणताही अनुभव नसताना कंपनीला यांत्रिकी साफसफाईचे कंत्राट दिल्याचा ठपका ठेवत तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंतांवर आरोप करण्यात आले होते. दरम्यान, या निर्णयामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदे सरकारच्या अनियमिततेबद्दल कारवाई करण्यास सुरुवात केली असून शिंदे सरकारच्या अनेक निर्णयांना स्थगिती दिली आहे. तर काही निर्णय रद्द करण्यात येणार असल्याचीही माहिती पुढे आली आहे.

### अबु आझमींचे अधिवेशन

अबू आझमींनी विधानसभेची प्रतिमा मलीन केली. त्यामुळे ही विधानसभा असा ठराव करते आहे की, अबू आझमी यांचं सदस्यत्व अर्थसंकल्प अधिवेशनाच्या शेवटच्या तारखेपर्यंत निलंबन करावे.

चंद्रकांत पाटलांनी प्रस्ताव मांडल्यानंतर सुधीर मुनगंटीवार उभे राहिले आणि आक्रमकपणे म्हणाले, अध्यक्ष महोदय, अबू आझमींचं निलंबन हे फक्त हे अधिवेशन संपेपर्यंतच का? छत्रपती शिवाजी महाराज यांना आपण देव किंवा देवापेक्षा जास्त मानतो. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान अबू आझमींनी केला आहे. औरंगजेब हा लुच्चा आणि लफंगा होता. औरंगजेबाच्या बापानेही काय म्हटलं आहे? शहाजहाँने सांगितलं होतं की, उन्हाळा वाढला आहे. माझं प्यायचं पाणी वाढवा, तेव्हा लुच्चा लफंगा औरंग्या काय म्हणतो? जिंदा रहना है तो रहो नही तो मर जाओ. जो स्वतःच्या बापाला असं म्हणतो आहे. त्याच्याबाबत अबू आझमी असं कसं काय बोलतो? त्याची भलामण अबू आझमी कशी काय करतात? मी चंद्रकांत पाटील यांना सांगू इच्छितो की, प्रस्तावात बदल करा. छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अपमान यासाठी कुठलंही आयुध लागणार नाही. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचा अपमान झाल्यास कुठल्याही आयुधाची मर्यादा बाळगू नये असं सुधीर मुनगंटीवार म्हणाले आहेत.

### गद्दारांना 'छावा' दाखवलाच पाहिजे;

त्यामुळे, औरंगजेबाचं कौतुक करणाऱ्या अबू आझमींचं यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापुरते निलंबन करण्यात आलं आहे. यासंदर्भात उद्धव ठाकरेंना पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, निलंबन किती दिवसासाठी केलंय हे महत्त्वाचं आहे. कारण, हे निलंबन ५ वर्षांसाठी करायला पाहिजे, अशी मागणी उद्धव ठाकरेंनी केली. यावेळी, आज सर्व आमदारांना 'छावा' सिनेमा दाखवण्यात येणार असल्याचे स्वागत करत गद्दारांना छावा सिनेमा दाखवायलाच हवा, असे म्हणत ठाकरेंनी नाव न घेता शिवसेना शिंदे गटावर हल्लाबोल केला. अबू आझमींच्या निलंबनावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, निलंबन कायमचं, ५ वर्षांसाठी केलं पाहिजे, ही सरकारची जबाबदारी आहे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटलं. छावा चित्रपट दाखवण्याची संकल्पना मांडली, त्यांचे मी अभिनंदन करतो. संभाजी महाराजांवरील छावा चित्रपट दाखवत आहेत, ते चांगलंच आहे. मात्र, शिवाजी महाराजांवरील चित्रपट देखील दाखवला पाहिजे. सूरतेला पळून गेलेल्यांना दाखवलं पाहिजे की, आपल्या महाराजांनी सूरत कशी लुटली होती, त्यांचं शौर्य समजलं पाहिजे. मेलो तरी बेहत्तर पण त्यांनी धर्म बदलला नाही, त्यामुळे आपल्या संभाजीराजांचा पिच्चर गद्दारांना दाखवलाच पाहिजे, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी नाव न घेत शिवसेना शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला.

अविश्र्वास प्रस्ताव आणायला आमच्याकडून उशीर झाला, पण आत्तापर्यंत त्या निलंबितच व्हायला पाहिजे होत्या, असे म्हणत निलम गोऱ्हे यांच्या देखील निलंबनाची मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे. तसेच, याच अधिवेशना निलम गोऱ्हे यांच्यावरील अविश्र्वास प्रस्तावावर आम्हाला चर्चा अपेक्षित आहे. आम्ही ज्या कारणासाठी अविश्र्वास प्रस्ताव दाखल केला आहे, ती कारणं तुमच्यासमोर येतील. याशिवाय पक्षांतर हा देखील विषय आहे, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले. निलम गोऱ्हे यांच्या मर्सिडीजच्या वक्तव्यावर बोलताना, माझ्या शिवसेनेच्या महिला रणरागिणींनी व शिवसैनिकांनी त्या प्रश्र्नावर उत्तर दिलंय, असे ठाकरे यांनी म्हटले.

### औरंगजेबाचे गोडवे गाणाऱ्या अबू आझमींचं

माझ्या जीवाला काही झाल्यास सरकारला जबाबदार धरावे असेही ते म्हणाले आहेत.

'या घटनेनंतर मला अनेक धमक्यांचे फोन येत आहेत .मला जीवे मारण्याचे फोन विविध नंबर वरून येत आहेत .मी पोलीस प्रोटेक्शनसाठी अर्ज करणार आहे .माझ्या जीवाला काही झाल्यास त्या सरकारला जबाबदार धरावे.वेगवेगळ्या नंबर वरून लोक फोन करून शिव्या घालत आहेत.

मी वादग्रस्त काहीही बोललेलो नाही .जे इतिहासात आहे तेच बोललो. मात्र माझ्या बोलण्यामुळे अधिवेशन बंद करणार असाल तर मी माझे शब्द मागे घेतले आहेत .मी इतिहासात जे लिहिला आहे त्याचाच दाखला दिला. असे अबू आझमी म्हणाले. दरम्यान, ठाकरे गटाकडून अबू आझमींच्या वक्तव्यावर टोकदार टीका केली जात आहे .यावर भाजपच्या बी टीमचा नेता असा उल्लेख करण्यात आला होता .त्यावरही अबू अझमींनी प्रत्युत्तर दिले .ते म्हणाले ' मी काहीही बी टीम नाही .ठाकरे गटच उद्या एटीएम सोबत जाईल .तीस वर्ष ते आधीही एकत्र होते .मग शिंदेंचे वही होगा जो मंजुरे खुदा होगा .मी विधानसभा अध्यक्षांची भेट घेऊन विचारेन की कुठल्या कायद्यानुसार कारवाई केली .कायदेशीर प्रक्रियेद्वारे ही दाद मागेन . माझ्यावर दाखल गुन्ह्यांबाबतही कायदेशीर लढा देऊ' असं अझमी म्हणालेत.

### कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंना

व्ह्यू अपार्टमेंटमध्ये मुख्यमंत्री कोट्यातून अल्प उत्पन्न गटासाठीच्या सदनिका प्राप्त केल्या होत्या. यानंतर तत्कालीन दिवंगत राज्यमंत्री तुकाराम दिघोळे यांच्या तक्रारीवरून जिल्हा प्रशासनाने सदनिका वाटपाची चौकशी केली होती. गुरुवारी (दि. २०) या प्रकरणात नाशिक न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांच्यासह त्यांच्या भावाला प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजारांचा दंड अशी शिक्षा सुनावली होती. दोन वर्षांच्या शिक्षेविरोधात कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी जिल्हा सत्र न्यायालयात अपील दाखल केले होते. यानंतर शिक्षेला स्थगिती मिळावी या अर्जावर सरकार पक्ष आणि बचाव पक्षांकडून युक्तिवाद करण्यात आला होता. कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती देऊ नये या मागणीसाठी अंजली दिघोळे यांनी याआधी हस्तक्षेप अर्ज दाखल होता. यानंतर शरद शिंदे यांनी देखील हस्तक्षेप अर्ज दाखल केला होता. या प्रकरणी आज म्हणजे ५ मार्च रोजी सुनावणी पार पडली.

### झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील

ही समस्या सोडवण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरांवर आता पती आणि पत्नी अशी दोघांच्याही नावाची संयुक्त नोंद करण्याचा निर्णय झाला आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या परिशिष्ट-२ मध्ये यासाठी बदल करण्यात आला आहे. या निर्णयानुसार आता घरांचे वितरण करताना घरांच्या वाटपपत्रावर पती-पत्नीवर दोघांची नावे नोंद करुन घरे वितरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### जालन्यातील घटना माणुसकीला काळीमा फासणारी; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नराधमाला कठोर शिक्षा देण्याची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यातील घटना अतिशय दुर्दैवी आहे, माणुसकीला काळीमा फासणारी आहे. सदर घटनेतील नराधमाला कठोर शिक्षा करावी, असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की, विरोधकांना झोपता उठता एकनाथ शिंदे दिसतात.खोटेनाटे आरोप करतात. जालन्यातील घटना अतिशय दुर्दैवी आहे, माणुसकीला काळीमा फासणारी आहे. गरम सळ्यांचे चटके देऊन बोराडे नावाच्या व्यक्तीला जखमी केले आहे. असे कृत्य करणाऱ्या नराधमाना कठोर शिक्षा दिली पाहिजे, जखमी व्यक्तीची जबाबदारी सरकार घेणार आहे. अशी माहिती यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली

### एकनाथ शिंदे यांनी पीडित रुग्ण कैलास बोराडे यांची दूरध्वनीद्वारे केली तब्येतीची चौकशी



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :**जालना जिल्ह्यात एका तरुणाला अमानुषपणे चटके देण्यात आले. जेव्हा ही गोष्ट महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना समजली त्यांनी त्वरित शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांना फोन करून त्या ठिकाणी जाऊन सदर व्यक्तीला खाजगी रुग्णालयात दाखल करण्याचे व काळजी घेण्याचे सांगितले व त्या रुग्णाचा संपूर्ण उपचाराचा खर्च एकनाथ शिंदे स्वतः करतील असे सांगितले.

भोकरदन (जालना) येथील आन्वा गावीतील कैलास बोराडे या तरुणावरील उपचारावरील सर्व खर्चाची जबाबदारी उचलणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रुग्णालय प्रशासनाला शब्द दिला आहे. सर्वोत्तम उपचार करा, उपचारात कसलीही कमी ठेवू नका. रुग्णाला लवकरात लवकर बरे करा, त्यांची काळजी घ्या, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

### संतोष देशमुखांच्या हत्या प्रकरणी निषेध नोंदवण्यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी बंद



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील चार्जशीट मधील आरोपींचे फोटो समोर आले आहेत. संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आल्यानंतर राज्यात संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान, आज जालना जिल्ह्यात संतोष देशमुखांच्या हत्या प्रकरणी निषेध नोंदवण्यासाठी बंद चे आवाहन करण्यात आले असून भोकरदन, जाफ्राबाद, राजूर मध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला आहे. या प्रकारणातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी, या मागणीसाठी जाफ्राबाद शहरात मराठा आंदोलक आक्रमक झाले असून, आंदोलकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात घोषणाबाजी करत आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

### भारतासह चीनवर 'या' तारखेला अमेरिका लादणार वाढीव आयात शुल्क

वॉशिंग्टन : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी (स्थानिक वेळेनुसार) काँग्रेसच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित करताना पहिल्याच दिवशी आयात शुल्कावरून भारतावर निशाणा साधला. ज्या देशांकडून वाढीव आयात शुल्क लादण्यात येईल, त्या देशांवर पुन्हा आयातशुल्क लागू करण्यात येईल, अशी ट्रम्प यांनी घोषणा केली.

डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, काही दशकांपासून अनेक देशांनी अमेरिकेला फसवलं आहे. असे आता पुन्हा होऊ देणार नाही. आयात शुल्क लादणाऱ्या देशांवर आयात शुल्क लादण्याची आता अमेरिकेची वेळ आहे.

# रोबोटिक सर्जिकल सिस्टीमला राज्य सरकारकडून मान्यता

दैनिक आपला विदर्भ







**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** रोबोटिक सर्जिकल सिस्टीम विथ अॅक्सेसरीज ही यंत्रसामुग्री राज्य योजनेअंतर्गत मान्यता मिळून ही सिस्टम शासकीय कर्करोग रुग्णालयातील स्त्रीरोग कर्क रोग विभागात स्थपित करण्यात आली. या यंत्रसामुग्रीसाठी टर्न की प्रोजेक्ट अंतर्गत ३२.५ करोड इतका निधी राज्य योजनेतून मंजूर करुन देण्यात आला.

यासाठी वैद्यकीय शिक्षण या विभागाचे मंत्री हसन मुश्रीफ तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे आयुक्त राजीव निवतकर, संचालक डॉ. अजय चंदनवाले, टाटा मेमोरियल हॉस्पीटलचे संचालक डॉ. कैलास शर्मा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, शासकीय कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड आणि स्त्रीरोग कर्करोग विभागाच्या प्रा. व विभागप्रमुख डॉ. अर्चना राठोड यांच्या सर्वांच्या प्रयत्नांनी ही यंत्रासामुग्री स्त्रीरोग कर्करोग विभागाच्या शस्त्रक्रियागृहात जानेवारी २०२५ मध्ये स्थापित करण्यात आली.

ह्युगो रास रोबोटिक सर्जिकल सिस्टेम व्दारे आता स्त्रीरोग कर्करोगाच्या रुग्णावर शस्त्रकिया पार पाडण्यात येणार आहे. या उपकरणाने शस्त्रक्रिया करण्याकरिता कॅन्सर हॉस्पिटलच्या डॉक्टरचे रोबोटिक प्रशिक्षण AIIMS न्यु दिल्ली येथे घेण्यात आले. या मधे एकुण ५ डॉक्टर २ स्टाफ नर्सचे प्रशिक्षिण पूर्ण झाले आहे.मराठवाड्यासह राज्यभरातील स्त्रीरोग कर्करोगाच्या महिला रुणाला त्याचा फायदा होणार आहे.

या रोबोटिक सर्जीकल सिस्टीम व्दारे गर्भाशय मुखाचे कर्करोग, गर्भाशयाच्या कर्करोगावर शस्त्रक्रिया, गर्भाशयाच्या गाठी व अंडाशयाच्या गाठी वर कर्करोगाच्या शस्त्रक्रिया करण्यात येतील. अतिशय लठ्ठ महिलामध्येही गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया रोबोटिक सहाय्याने सहजतेने करता येतील. अशी माहिती घाटी रुग्णालयाचे डॉक्टर शिवाजी सुक्रे यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे.

### प्रशांत कोरटकर, सोलापूरकर आणि अबू आझमी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पहिजे अमोल मिटकरी यांची आक्रमक भूमिका

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह शब्द बोलणाऱ्या प्रशांत कोरटकर, सोलापूरकर आणि अबू आझमी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पहिजे, अशी मागणी आमदार अमोल मिटकरी यांनी करून आक्रमक भूमिका घेतली आहे.



आमदार अमोल मिटकरी म्हणाले की, प्रशांत कोरटकर असतील, सोलापूरकर असतील किंवा अबू आझमी असतील. एकाने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला. एकाने शंभूराजांचा अपमान केला आणि एकाने औरंगजेबाचे उदात्तीकरण केले. या तिघांवर देखील देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पहिजे. सरकार म्हणून काल मागणी शिंदे यांनी केली आणि तिचं मागणी आज विरोधक करतायत तर, त्या मागणीला माझे समर्थन आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत आक्षेपार्ह हे विधान करणारी अवलाद या महाराष्ट्रात जिवंत राहता कामा नये या मताचा मी आहे.मी सरकारचा निषेध म्हणून गेलेलो नाहीये. विरोधकांनी आंदोलन केले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या सन्मानासाठी आहे. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या सन्मानार्थ त्यात सत्ता आणि विरोधक येतच नाही. सर्वांनी एकत्र येऊन हा मुद्दा उचलला पाहिजे, असे मत आमदार अमोल मिटकरी यांनी व्यक्त केले

### शासकीय अधिकारी सत्ताधाऱ्यांचे हस्तक न होता निष्पक्षपती प्रमाणे कामे करावे, मला हक्कभंग आणण्यास भाग पाडू नका – खासदार प्रणिती शिंदे

दैनिक आपला विदर्भ




**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मंगळवारी जिल्हा परिषदेमध्ये खासदार निधी आणि जिल्हा नियोजन समितीच्या कामांचा आढावा घेतला.

या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, प्रशांत साळे, जिल्हा उपाध्यक्ष राजेश अप्पा पवार, संदीप पाटील, रविकांत कोळेकर, मनोज यलगुलवार, तिरुपती परकीपंडला आदी ग्रामीण भागातील पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत खासदार शिंदे यांनी खासदार फंड आणि जिल्हा परिषदेच्या विविध निधीचा आढावा घेतला. जिल्हा परिषदेतून काम वाटत होता त्याचे ६० / ४० असे प्रमाण ठेवण्याच्या सूचना केल्या. सोलापूर लोकसभा विधानसभा मतदारसंघातील काही भाजपचे आमदार काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची कामे अडवतात त्यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष घालावे, खासदार निधी आणि आमदारांच्या निधीचा काय संबंध असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. शासकीय अधिकारी सत्ताधाऱ्यांचे हस्तक न होता निष्पक्षपती प्रमाणे कामे करावे, काँग्रेस कार्यकर्त्यांची, सामान्य जनतेचे कोणतेही कामे अडवू नका अन्यथा मला विभागीय चौकशी लावण्यास हक्कभंग आणण्यास भाग पाडू नये अशी ही कठोर भूमिका खासदार प्रणिती शिंदे यांनी या बैठकीत मांडली.

या बैठकीत अनेक विषयांवर सिद्धाराम म्हेत्रे व सुरेश हसापुरे यांनी प्रश्न उपस्थित करीत त्याची सोडवणूक करण्याची मागणी केली.

# गृहमंत्र्यांनी या अगोदर कारवाई का केली नाही

## माजी गृहमंत्री देशमुख यांचा प्रश्न

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपीवर या अगोदर का कारवाई करण्यात आली नाही, असा प्रश्र्न माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांची पत्रकार परिषदेत केला.

पत्रकार परिषदेत बोलताना माजी गृहमंत्री अनिल देशमुख म्हणाले की, संतोष देशमुखांची क्रूरपाने हत्या केली. याची माहिती, फोटो, व्हीडीओ तपासत समोर आले. किती क्रूरपने ही हत्या झाली, गृहमंत्री यांना या व्हिडिओची माहिती अगोदरच होती. ८० ते ८५ दिवसांपूर्वी हे माहीत होते. तर, मग तेव्हा का कारवाई केली नाही.मंत्री धनंजय मुंडे राजीनामा आरोग्य कारणाने घेतला की, अजित पवार आणि मुख्यमंत्री यांनी सांगितले आहे की, नौतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला आहे हा प्रश्र्न आहे. कोकाटेंला वाचवण्यासाठी राज्य शासनाकडून प्रयत्न सुरू आहेत.

कोकाटेंवर कारवाई झाली नाही, संरक्षण मिळत नाही, तोपर्यंत कारवाई होत नाही. इतरांवर कारवाई होते. तर, कोकाटेंवर २४ तासात ही कारवाई का होत नाही?असा प्रश्र्नही त्यांनी केला. विजय वडेट्टीवार यांनी आरोप केला तर, त्यांच्याकडे काही पुरावे असतील तर कारवाई व्हायला पाहिजे,कोरटकर हे नागपुरचे असून, त्याचे भाजपचे घरगुती सबंध असल्याचे फोटो सोशल मीडियावर आहेत. अशा लोकांना वाचवण्याचा प्रयत्न असेल तर त्याला कोणी फरार केले? घरातून तो कसा फरार होऊ शकतो? हा प्रश उपस्थित होतो.भुजबळ यांना मंत्री पद मिळते की, कोणाला मंत्रीपद द्यायच? त्यावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री निर्णय घेतील, त्यावर आम्ही काय बोलणार असे मत यावेळी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

### महाराष्ट्र एस.टी. कामगार आक्रमक, राज्यभर निदर्शने; मुंबई सेंट्रल बस स्थानकात संतप्त आंदोलन



**मुंबई/प्रतिनिधी :** एस.टी. कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी आज राज्यभर निदर्शने सुरू असून, मुंबई सेंट्रल बस स्थानक परिसरातही महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेकडून मोठे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात एस.टी. वाहनचालक, कंडक्टर, मेकॅनिकल कर्मचारी यांसह शेकडो कर्मचारी सहभागी झाले आहेत. बस स्थानकाच्या गेटवर कामगारांनी हातात पोस्टर घेऊन घोषणाबाजी करत निषेध नोंदवला. या वेळी वेतन थकबाकी तत्काळ मिळावी, महागाई भत्ता वाढवावा, प्रवाशांना सुटे पैसे देताना अडचण येत असल्याने भाडेवाढ ५ रुपये च्या पटीत करावी, आर.टी.ओ. दंड वसुलीबाबत निर्णय घ्यावा अशा मागण्या करत सध्या अधिवेशन सुरू असून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री धडाकेबाज निर्णय घेत आहेत. त्यामुळे त्यांनी आमच्या व्यथा समजून घ्याव्यात, आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. जर सरकारने यावर त्वरित निर्णय घेतला नाही, तर लवकरच तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही कामगार संघटनांनी दिला आहे.

# महायुतीच्या सरकारमध्ये पारदर्शक कारभार

## मंत्री संजय राठोड यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ




**अमरावती/प्रतिनिधी :** राज्यात महायुतीच्या नेतृत्वात पारदर्शक कारभार सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीबाबत सुप्रीम कोर्टाकडे प्रकरण आहे. त्यावर भविष्यात निर्णय होऊ शकतो.असे मत मंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केले.ते माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, राज्यात महायुतीचा सरकार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात असून या सरकारने अत्यंत पारदर्शक सुरू आहे. राज्यात महायुतीच्या नेतृत्वात सर्वांगीण विकास करण्याला प्राधान्य दिले जात आहे. यवतमाळचे पालकमंत्री पदासह अमरावती जिल्ह्यात संपर्क मंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी अमरावतीची जबाबदारी दिली आहे. त्यानिमित्ताने अमरावती येथे जिल्हा पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यासाठी अमरावतीत आगमन झाले आहे. राज्यात महायुतीच्या नेतृत्वात पारदर्शक कारभार सुरू आहे.सर्वसामान्य माणूस शासनाचा केंद्रबिंदू आहे. समाजातील प्रत्येक घटकासाठी महायुती सरकारने निर्णय घेतला, त्यामुळेच जनतेने भरभरून आशीर्वाद महायुतीला दिले. तत्कालीन मुख्यमंत्री आमचे नेते एकनाथ शिंदे यांनी प्रत्येक घटकासाठी निर्णय घेतला. यवतमाळच्या निकृष्ट पाईपलाईन प्रकरणात एकनाथ शिंदे यांचे नाव आल्याचा आरोप होतो आहे.मात्र त्यामध्ये काही तथ्य नसून त्यावेळेस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नव्हते असे संजय राठोड म्हणाले. सध्या हे प्रकरण न्यायालयात सुरू आहे, त्यामुळे न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर पुढे बोलता येईल.असे मत मंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केले

## विविध वृत्त...

### चिखलीत संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ शिवसेना शिंदे गट आक्रमक



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणाने महाराष्ट्रात पुन्हा संताप उसळला आहे. या घटनेच्या निषेधार्थ या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याला फाशी देण्याची मागणी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने करण्यात आली असून, चिखली येथे शिंदे यांच्या शिवसेनेने चिखली येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आले आहे. वाल्मिक कराडच्या प्रतिमात्मक पुतळ्याला जोडे मारून त्याचा पुतळा जाळून तीव्र निषेध आंदोलन केले आहे. यावेळी आंदोलकांनी वाल्मिक कराडला फाशी देण्यात यावी, अशी जोरदार मागणी करत निषेध नोंदवला.

### हे सरकार दुतोंडी सरकार आहे आमदार अंबादास दानवे यांची टिका



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राला लाभलेले हे सरकार दुतोंडी सरकार आहे. त्यांच्यावर कोणताही विश्र्वास नाही, अशी टिका विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते आमदार अंबादास दानवे यांनी केली. यावेळी ते म्हणाले की, हे सरकार आल्यापासून सातत्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला जातोय आणि त्याकडे दुर्लक्ष केले जातेय. सगळ्यात आधी तर, सुरुवात या राज्याचे राज्यपाल कोश्यारी त्यांनी सुरुवात केली होती. आता ज्या पद्धतीने कोरटकर यांनी इंद्रजीत सावंत यांना फोन करून छत्रपती शिवराय यांच्याविषयी वक्तव्य केल, हा अपमान आहे आणि एकीकडे अबू आझमी यांचा विरोध सत्ताधारी करतात आणि आम्हीही केलेला आहे. एकीकडे सोलापूरकर आणि कोरटकर यांना सरकार पाठिशी घालते, त्यांच्यावर कोणतीही कारवाई करत नाही, त्यांना अटक केली नाही. त्यांना संरक्षण देत आहे, हे सरकार दुतोंडी सरकार आहे.अशी टिका विरोधी पक्षनेते तथा आमदार अंबादास दानवे यांनी सरकारवर केली

### अबू आझमीची आमदारकी रद्द करावी मंत्री नितेश राणे यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** औरंगजबावर स्तुतीसुमने उळणारे अबू आझमी यांच्यासाठी निलंबन ही फार कमी शिक्षा आहे.त्यांची आमदारकी रद्द करावी,अशी मागणी मंत्री नितेश राणे यांनी केली. अबू आझमी यांनी संभाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या अपमानित वक्तव्याबद्दल त्यांना जास्तीत जास्त शिक्षा झाली पाहिजे, असे मत मंत्री नितेश राणे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त करीत अबू आझमीचे निलंबन करण ही शिक्षा फार कमी आहे,त्यांना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी यांची मागणी आम्ही केलेली आहे. त्यांची आमदारकी रद्द व्हावी त्यांना मिळणारा पगार बंद व्हावा, त्यांना पाकिस्तानला पाठवले पाहिजे, राहुल गांधी यांना पण शिक्षा झाली पाहिजे त्यांनी देखील जयंतीच्या दिवशी पुण्यतिथी ट्विट केले होते. त्यामुळे राहुल गांधी यांना सुद्धा शिक्षा करावी, अशी मागणी मंत्री नितेश राणे यांनी केली.

### सायबर गुन्ह्यांमध्ये उकल होण्याच्या टक्केवारीत वाढ!

**मुंबई/प्रतिनिधी :** नोव्हेंबर २०२४ अखेरपर्यंत सायबर गुन्ह्यांची उकल होण्याची टक्केवारी २२ टक्के होती. ती वर्षाअखेर म्हणजेच माहे डिसेंबर २०२४ अखेर पर्यंत २५ टक्के इतकी झाली आहे. ऑनलाईन फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये ६१३ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून ६८३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हे उकल होण्याची टक्केवारी १९ टक्के इतकी आहे. माहे डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत ७५३ गुन्हे उघडकीस आणले व ७४८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हे उकल होण्याची ही टक्केवारी २२ टक्के इतकी आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते 'ऑस्ट्रेलिया-भारत क्रीडा उत्कृष्टता मंच'चे उद्घाटन, क्रीडा क्षेत्रात नवे पर्व उदयास



दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा/प्रतिनिधी : भारत-ऑस्ट्रेलिया देशांमधील क्रीडा क्षेत्रातील सहकार्य वृद्धींगत करण्याच्या दृष्टीने केंद्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा निखिल खडसे यांच्या हस्ते गुजरातमधील गीफ्ट सिटीमध्ये 'ऑस्ट्रेलिया-भारत क्रीडा उत्कृष्टता मंच'चे उद्घाटन बुधवारी करण्यात आले.**

दोन देशांमधील क्रीडा सहकार्य वाढवून क्रीडा क्षेत्रातील गुणवान खेळाडूंचा शोध आणि विकास, स्पर्धा आयोजन, सर्व समावेशकता, खाजगी क्षेत्राची भूमिका, शिक्षण व क्रीडा विज्ञान यांची भूमिका तसेच क्रीडा क्षेत्रातील व्यापार, पर्यटन आणि गुंतवणुकीला चालना देणे हे या मंचचे मुख्य उद्देश आहे.

केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी भारत आणि ऑस्ट्रेलियातील क्रीडा क्षेत्रातील वाढत्या सहकार्यावर भर दिला, विशेषत: क्रिकेट आणि हॉकी खेळासह इतर खेळांमध्ये खासगी क्षेत्राची गुंतवणूक, क्रीडा विज्ञान आणि क्रीडा उद्योगातील व्यापार हे परस्पर संबंधाचे मुख्य क्षेत्र आहेत, असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, क्रीडा क्षेत्राबद्दल असलेली आवड हा भारत आणि ऑस्ट्रेलिया यांना जोडणारा समान धागा आहे. या ऐतिहासिक मंचाच्या माध्यमातून आम्ही क्रीडा क्षेत्रातील संवादांना क्रिकेट आणि हॉकी खेळाच्या पलीकडे नेण्याचा प्रयत्न करत आहोत, ज्याद्वारे क्रीडा संरचना आणि क्रीडा उद्योगातील गुंतवणूक यांच्या वाढीस चालना मिळेल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या दूरदृष्टीने क्रीडा क्षेत्राला सामर्थ्यवान करण्यासाठी आम्ही क्रीडा स्पर्धांचे आयोजन, टॉप्स, फिट इंडिया आणि अस्मिता सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून, आम्ही कार्य करत आहोत, असे त्या म्हणाल्या. या मंचाद्वारे ऑस्ट्रेलियाच्या क्रीडा क्षेत्राच्या विकासातील कल्पनांचा उपयोग करून भारताला सर्वोत्तम ओळख मिळणार आहे. २०३६ ऑलंपिक आणि पॅरालंपिक गेम्सच्या आयोजनावर द्विपक्षीय देशांमध्ये आदान-प्रदान करून भारतीय आणि ऑस्ट्रेलियन क्रीडा संस्थांमधील संबंध मजबूत करणे, क्रीडा उद्योगातील खासगी गुंतवणूक आणि व्यापाराला प्रोत्साहन देणे, क्रीडा विज्ञान व तंत्रज्ञानाद्वारे खेळाडूंच्या कार्यक्षमतेत वृद्धी करणे आणि भविष्यातील क्रीडा धोरण तयार करण्यावर भर दिला जाणार आहे, असेही त्या म्हणाल्या.

गुजरात राज्याचा क्रीडा संरचनांच्या दृष्टीकोनातून वाढता प्रभाव भारताला क्रीडा महासत्तेच्या मार्गावर गतिल करेल. आदान-प्रदानामुळे मोठ्या भागीदारींतून क्रीडा संस्कृतीचा विकास होऊन भारत जागतिक क्रीडा शक्ती बनेल, असा विश्र्वास केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी व्यक्त केला.

ऑस्ट्रेलिया-भारत क्रीडा उत्कृष्टता मंच भारताच्या क्रीडा क्षेत्रातील सक्षम व स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, ज्यामध्ये ऑस्ट्रेलिया एक महत्त्वाचा धोरणात्मक भागीदार ठरेल. ज्यामध्ये ऑस्ट्रेलिया-भारत क्रीडा संस्थांमधील संबंध वाढविणे आणि भारताच्या क्रीडा, उच्च शिक्षणाच्या संबंधित बाबींवर दीर्घकालीन धोरणांचा समावेश होणार आहे.

ऑस्ट्रेलिया-भारत क्रीडा उत्कृष्टता मंचाच्या उद्घाटन समारंभाला ऑस्ट्रेलियाचे भारतातील उच्चायुक्त फिलिप ग्रीन, गुजरात राज्याचे क्रीडा व सांस्कृतिक कार्य मंत्री हर्ष संघवी आणि ऑस्ट्रेलियातील क्रीडा आणि उच्च शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना रा.प. कामगारांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यांसाठी आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना रा.प. कामगारांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यांची पुर्तता होण्यासाठी आज आंदोलन करण्यात आले यात कालावधीतील देय होणारी थकबाकी त्वरीत अदा करा. सन २०१८ ची महागाई भत्त्याची थकबाकी कामगारांना अदा करण्याचा मा. न्यायालयाच्या आदेशाची त्वरित अंमलबजावणी करा.सन २०१६ ते २०२० या कालावधीसाठी एकतर्फी जाहीर केलेली वेतन वाढ यातील मान्य केल्याप्रमाणे घरभाडे भत्याचा दर ८,१६,२४ टक्के करुन थकबाकी त्वरित अदा करा.

सन २०१६ ते २०२० या कालावधीसाठी एकतर्फी जाहीर केलेली वेतन वाढ यातील वार्षिक वेतन वाढीचा दर पुर्वलक्षीप्रमाणे ३%करून त्याची थकबाकी त्वरित द्या. सर्व देय थकबाकी रकमेच्या अधिन राहून कामगारांना सध्या मिळत असलेली वाढीव थकबाकी रक्कम पूर्वीप्रमाणे सुरु ठेवा. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे रा.प. कामगारांचा महागाई भत्ता ५३ टक्के करून थकबाकीसह त्वरित द्या. भविष्य निर्वाह निधीच्या खात्यातून कामगारांच्या मागणीनूसार त्वरित उचल द्या. प्रवासीभाडे वाढ पूर्वीप्रमाणे ५ रुपयांच्या पटीत करून सूधारित भाडे करा.अन्यायकारक शिस्त व आवेदन पध्दत रद्द करून नविन सुधारित शिस्त आवेदन पध्दत तयार करून लागु करा. कोरोना कालावधीत कामगारांचे घेतलेले रजेचे अर्ज रद्द करून त्यांना एल.डी.पी. (लॉकडाऊन हजेरी) लावून त्यांची रजा त्यांच्या खात्यावर वर्ग (संचित) करा. बारा महिन्यात चालवण्यात येणाऱ्या रा.प. नियतांची सरासरी विचारात घेऊन कामगारांना समय वेतनश्रेणीवर



(आर.टी.एस.) घेण्याचे मान्य केल्याप्रमाणे परिपत्रीय सूचना (आदेश) काढा व अंमलबजावणी करा.मल्टीट्रेड बाबत मा. महाव्यवस्थापक यांच्याकडून मान्य केल्याप्रमाणे यांच्या समवेत रा.प. प्रशासन व संघटना प्रतिनीधी यांच्या त्वरित बैठक घेऊन तोडगा काढा. आर.टी.ओ. विभागाकडून होणारी दंडात्मक कारवाई चालकांच्या पगार खात्यातून वसूल करणे मान्य केल्याप्रमाणे त्वरित बंद करा. खात्यांतर्गत उत्तीर्ण झालेल्या कामगारांना बढत्या देतांना प्रथम बदली अर्जानूसार बदल्या देऊन उर्वरित रिक्त जागांवर बदल्या द्या. कार्यशाळा कर्मचाऱ्यांची कमतरता भरून काढा.कार्यशाळेला स्पेअर पार्ट पुरवठा करा अशया मागण्या करत. दुपारी दि५/३/२५ रोजी राज्यव्यापी निदर्शन आंदोलन उमरखेड आगाराच्या गेट समोर१३:०० ते१३:३० दरम्यान करण्यात आले होते. यात प्रामुख्याने उपस्थित श्री सुरेश मोरे आगार सचिव,श्री सजंय शिरल्लू अध्यक्ष, कोषाध्यक्ष सजंय कदम, कार्याध्यक्ष विकास सुर्यवंशी, ईतर प्रमुख पदाधिकारी मध्ये सचिन मडके, दत्तराव उगले, श्रीराम तिवारी, संतोष फाळके,सदा फाळके,तामसकर,भारती, सचिन चांदीवाले यासह७५,८० सभासद हजर होते यात एसटी कामगारांच्या प्रमुख प्रलंबित मागण्या होत्या

### मेळघाटातील चाकर्दा येथे भीषण आग; संपूर्ण वस्ती जळून खाक, अनेक कुटुंब उघड्यावर

**अमरावती/प्रतिनिधी :** धारणी तालुक्यातील नागढाना येथील नवी वस्ती चाकर्दा येथे मंगळवारी रात्री ९ च्या सुम ारास भीषण आगीची दुर्घटना घडली. या अचानक लागलेल्या आगीत एका रांगेत असलेल्या ७ पेक्षा जास्त घरे पूर्णत: जळून खाक झाले आहे. तर अन्य २ घरांचेही मोठे नुकसान झाले आहे. नागढाना येथील चाकर्दा परिसरात लागलेली आग एवढी भयावह होती की काही क्षणातच संपूर्ण वस्तीने पेट घेतला अनेक नागरिक घरात नसल्याने जीवितहानी टळली असली तरी त्यांचा संपूर्ण संसार उद्धवस्त झाला आहे. या भीषण आगीत घरातील दुचाकी, गॅस सिलेंडर, कपाटातील दागिने, कपडे, जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य आणि शेतातून आणलेली तूरही भस्मसात झाली. सततच्या कष्टाने उभारलेली घरे एका रात्रीत संपून गेली, त्यामुळे अनेक कुटुंबे रस्त्यावर आली आहे. स्थानीय प्रशासन आणि गृहनिर्माण विभागाने त्वरित मदत जाहीर करावी अशी नागरिकांची मागणी आहे.या आगीमुळे सर्वत्र गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती.अग्निशमन विभागाच्या अथक प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आली असली तरी मात्र आदिवासी कुटूंबाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे.

# स्थानिक स्वराज निवडणुका लांबनीवर: इच्छुक उमेदवारांमध्ये नाराजी चा सूर

दैनिक आपला विदर्भ

■ उमेश बोराटे

**शिरपूरजैन:** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्याने पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्यांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण पसरले आहे. मालेगाव नगर पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर सध्या या संस्थांवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे निवडणुकीची प्रतीक्षा करणाऱ्या इच्छुक उमेदवारांच्या पदरी निराशा पडली आहे. आणि हा विषय नेतेमंडळीच्या जिव्हारी लागला आहे त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी टाहो फोडला आहे.

एप्रिल ते मे महिन्यात निवडणुका होण्याची शक्यता होती. मात्र, त्या लांबणीवर पडल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये निराशा पसरली आहे. निवडणुकीच्या तयारीसाठी केलेला खर्च आणि प्रचार यावर इच्छुकांनी तात्पुरता ब्रेक लावल्याचे दिसत आहे. विविध प्रकारचे जनसंपर्क वाढवणे, कार्यकर्त्यांचे स्नेहभोजन, उत्सवांमध्ये सहभाग आणि प्रचारासाठी होणाऱ्या खर्चावर आता काही काळ खीळ बसली आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांना आपल्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याची वेळ आली आहे. काही ठिकाणी मात्र अजूनही वातावरण तापलेले आहे. त्याच मुळे कारणा मुळे इच्छुकच्या स्वप्नातील पूर ओसरला आहे.



### इच्छुकांच्या राजकीय हालचाली मंदावल्या!

निवडणुका केव्हा होतील आणि प्रचार पुन्हा कधी सुरू करायचा याबाबत सर्वच जण संभ्रमात आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर राजकीय हालचाली मंदावल्या असून इच्छुक उमेदवारांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. निवडणुक कार्यक्रमाकडे इच्छुकांचे लक्ष लागले असून ते जाहीर झाल्यावरच वातावरण तापणार आहे.

### निवडणुकीची अनिश्‍चिता, भेटीगाठी थांबल्या!

कार्यकर्त्यांशी संपर्क साधणे, सभा घेणे आणि विविध ठिकाणी भेटीगाठी करून आपला जनाधार मजबूत करण्यासाठी उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात तयारी केली होती. मात्र, निवडणुकीच्या अनिश्चिततेमुळे हे सर्व थांबले आहे.